NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(दुपार)

दिनांक १८.१०.२०२६ रविवार

(कामगिरी)

१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :–

दिनांक १७.१०.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ कायद्यान्वये १२ केसेसमध्ये ११ ईसमावर कारवाई करून एकुण १,२२,१४१/–रू. चा मुद्देमाल जप्त केला. जुगार कायद्यान्वये ०७ केसमध्ये २१ ईसमावर कारवाई करून एकुण १,५८,३७५/–रू. चा मुद्देमाल जप्त केला. दिनांक १७.१०.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक १८.१०.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, केलेल्या रात्रगस्तीमध्ये कलम १३५ म.पो.का. कायद्यान्वये ०७ ईसमांवर कारवाई करण्यात आलेली आहे.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये, ओव्हरस्पीड वाहन चालविणे कलम १८४ मोवाका अन्वये २५ केस, सिग्नल जंपींग कलम २३९/१७७ मोवाका अन्वये ४४ केसेस, विना परवाना वाहन चालविणे कलम १३० मोवाका अन्वये १०० केसेस, ऑन रोड पार्कींग कलम १२२/११७ मोवाका अन्वये २१८ केसेस, रॉग साईड कलम ४/१२२ मोवाका अन्वये १७७ केसेस, अवैध प्रवासी वाहतुक कलम १९४(ए) मोवाका अन्वये १११ केसेस, ड्रायव्हींग विदाऊट युनिफार्म कलम २१/१८ मोवाका अन्वये १३ केसेस, ट्रिपलसिट वाहन चालविणे कलम १२८/१७७ मोवाका अन्वये १५७ केसेस, धोकादायकरित्या बेदरकारपणे वाहन चालविणे कलम १८४ मोवाका ०३ केस, फॅन्सी नंबरप्लेट कलम ५१/५० सीएमव्हीआर अन्वये ११ केसेस, विदाऊट सिटबेल्ट ड्रायव्हींग कलम १९४ बी(१) मोवाका अन्वये ०५ केसेस, विना हेल्मेट गाडी चालविणे कलम १२९/१७७ मोवाका अन्वये ८९० केसेस, वाहन चालवितांना भ्रमणध्वनीचा वापर करणे ३१ केस, ड्रंकन ड्राईव्ह कलम १८५ मोवाका अन्वये १३ केसेस व इतर कलमांखालील वेगवेगळे गुन्हे असे एकुण १,९३५ वाहन चालकांवर कारवाई करून त्यांचेकडून एकूण रू. ६,०४,९५०/–रू. इतके तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

२) सिताबर्डी पोलीसांची कामगिरी :– जुगार खेळणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा दाखल.

दिनांक १७.१०.२०२६ चे १८.४० वा. ते २०.३० वा. चे दरम्यान, सिताबर्डी पोलीसांनी मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, पोलीस ठाणे हद्दीत, धरमपेठ गाडगा, आंबेडकर नगर, शंकरलाल सोनकर यांचे घराचे तिसऱ्या माळ्यावरील खोलीत पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, नमुद ठिकाणी आरोपी क्र. १) अजय हरीराम सांगोडे, वय ५८ वर्षे, रा. आरटिओ मागे, सिव्हील लाईन, नागपुर २) दिनेश दिपक उईके, वय ३३ वर्षे, रा. प्रभात नगर, दिघोरी, नागपुर ३) आकाश शेषराव गौरखेडे, वय ३० वर्षे, रा. धरमपेठ, नागपुर ४) मनोज गणेश कनोजिया, वय ३३ वर्षे, ५) सय्यद ईरफान कमरअली, वय ३८ वर्षे, ६) अमीत रोशन सहारे, वय २८ वर्षे, ७) राजु तुळशिराम सडमाके, वय ४० वर्षे, ८) महादेव ईश्वर सोमकुंवर, वय ४८ वर्षे, ९) करण टिकम सोनकर,

वय २० वर्षे, सर्व रा. धमरपेठ गाडगा, आंबेडकर नगर, सिताबर्डी, नागपुर हे ताश पत्यावर पैश्याची बाजी लावुन हार–जीतचा जुगार खेळतांना समक्ष मिळुन आले. आरोपींचे ताब्यातुन रोख, वेगवेगळ्या कंपनीचे ०८ मोबाईल फोन व ईतर साहित्य असा एकुण १,३५,७५०/– रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींविरूध्द पोलीस ठाणे सिताबर्डी येथे कलम ४, ५ महा. जुगार प्रतिबंधक अधिनीयम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्रीमती विनीता शाहु अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभाग) नागपूर शहर, मा. श्रीमती अन्नपुर्णा सिंह, पोलीस उप आयुक्त (परि.क्र.२), मा. श्री. सुनिलसिंह पवार, सहा. पोलीस आयुक्त (सिताबर्डी विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. सुहास राऊत, पोउपनि. शाम बारंगे, पोहवा. नंदकिशोर, आशिष बहाळ, नापोअं. देवेंद्र सुर्यवंशी, पोअं. राजेश घोंगळे, नैनिश तलवारे, बबलुकुमारसिंग ठाकुर, प्रशांत भोयर व मपोअं. प्रणाली शिंदे यांनी केली.

(गुन्हे)

१) पोलीस ठाणे लकडगंज :– शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.

दिनांक १७.१०.२०२६ चे १९.१५ वा. चे सुमारास, लकडगंज पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना खात्रीशीर माहीती मिळाली की, क्वेटा कॉलोनी, बिएसएनएल ऑफीसमागील गल्लीमध्ये हिरव्या रंगाची टि–शर्ट घातलेला ईसम शस्त्रासह संशयीतरित्या फिरत आहे, अशा माहीतवरून, नमुद ठिकाणी गेले असता, तेथे मिळालेल्या वर्णनाचा ईसम पोलीसांना पाहुन पळु लागला. त्याचा पाठलाग करून त्यास ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव दिनेश रमेश हेडाऊ, वय २५ वर्षे, रा. घासबाजार रोड, जुनी मंगळवारी, लकडगंज, नागपुर असे सांगीतले. त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे कंबरेत पॅन्टचे आंत एक लोखंडी धारदार चाकु किंमती २००/– रू. चा मिळून आल्याने जप्त करण्यात आला.

आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु बाळगून समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, सरतर्फे पोअं. कुणाल मसराम यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे लकडगंज येथे पोहवा. गणेश ठाकुर यांनी आरोपीविरूध्द कलम ४, २५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

२) पोलीस ठाणे ईमामवाडा :– प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.

दिनांक १७.१०.२०२६ चे ०९.१५ वा. चे सुमारास, फिर्यादीचे वडील नामे पवन धनिराम गजभिये, वय ५७ वर्षे, रा. रामेश्वरी रोड, जयभिम नगर, भगवान नगर, नागपूर हे त्यांचे सायकलने एस.टी. महामंडळ, गणेशपेठ डेपो येथे कामावर जात असतांना, पोलीस ठाणे ईमामवाडा हद्दीत मेडीकल कॉलेज मुख्य प्रवेशद्वारासमोर, राजाबाक्षा मैदान रोडवर त्यांचे मागुन येणाऱ्या चारचाकी वाहन क्र. एम.एच ३३ जि. ११३५ चे चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन, फिर्यादीचे वडीलांचे सायकलला मागुन धडक देवुन गंभीर जखमी केले व घटनास्थळावरून पळून गेला. गंभीर जखमी फिर्यादीचे वडीलांना लोकांनी उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल ट्रॉमा सेंटर येथे दाखल केले होते. उपचारादरम्यान रात्री २१.१० वा. डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले होते.

याप्रकरणी फिर्यादी भृगन पवन गजभिये, वय २६ वर्षे, रा. रामेश्वरी रोड, जयभिम नगर, भगवान नगर, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे ईमामवाडा येथे पोउपनि. नितेश सानप ८६६९०६१८७९ यांनी

चारचाकी वाहन चालक आरोपीविरूध्द कलम १०६(१), २८१, १२५(ब) भा.न्या.सं., सहकलम १३४, १७७, १८४ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

३) पोलीस ठाणे जरीपटका :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.

दिनांक १५.१०.२०२६ चे १८.०० वा. ते दिनांक ७६.१०.२०२६ चे ०९.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे जरीपटका हद्दीत प्लॉट नं. ९१, विजय नगर, नारा, नागपूर येथे राहणाऱ्या फिर्यादी श्रीमती शामला अरविंद टेंभुरकर, वय ६२ वर्षे ह्या आपले राहते घराला कुलुप लावुन परिवारासह मानकापुर येथे नंणदेचे घरी गेल्या असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराचे दाराचे कुलुप तोडुन, घराचे आंत प्रवेश करून, आलमारीमधील रोख ७,०००/—रू. तसेच, सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती १,४२,०००/— रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे जरीपटका येथे पोउपनि. आकाश महल्ले ९०६७६३९४३५ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५,३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

(अकस्मात मृत्यु)

पोलीस ठाणे अंबाझरी :— दिनांक १७.१०.२०२६ चे १४.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे अंबाझरी हद्दीत, लॉ—कॉलेज चौक ते रविनगर चौक उड्डाणपुलाचे पिल्लर क्र. पि १५ समोर, गुलमोहर अपार्टमेंट चे भिंतीलगत फुटपाथवर एक अनोळखी पुरूष वय अंदाजे ३० ते ३५ वर्षे वयाचे, रंग सावळा, चेहरा लांब, बांधा सडपातळ, उंची ५ फुट ५ इंच, डोक्याचे केस काळे व बारीक, नाक जाडसर, अंगात पांढरा शर्ट ज्यावर आकाशी रंगाची डिझाईन व निळा जिन्स पॅन्ट घातलेला, उजवे हातात स्टिलचा कडा घातलेल्या वर्णनाचे ईसम बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने, पोलीसांनी त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही. नमुद मृतकास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे अंबाझरी येथे संपर्क साधावा.

याप्रकरणी फिर्यादी आकाश चैनसिंग चव्हाण, वय ३८ वर्षे, रा. झिंगाबाई टाकळी, मानकापुर, नागपुर यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे अंबाझरी येथे पोउपनि. नानाभाऊ काकड यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

स्वा/—
(अंकुश राठोड)
पोलीस उप निरीक्षक,
पोलीस जनसंपर्क अधिकारी,
नागपुर शहर.